**" प्रेसनोट "** दिनांक :- ०७/०८/२०२६.

# मुंबई पोलीसांच्या १९३० सायबर हेल्पलाइन व सायबर पोलीस ठाणे दक्षिण विभाग, मुंबई यांनी फिर्यादी यांचे सायबर फसवणुक गुन्हयातील रु.१,८३,०३,४९२/- (९२ %) वाचविल्याबाबत.

..............................................

दिनांक ०६/०८/२०२६ रोजी फिर्यादी हे जनरल मॅनेजर अकाउंट म्हणुन कामकरीत असलेल्या खाजगी कंपनीचे डायरेक्टर यांचा फोटो व नाव वापरलेल्या Whatsapp खातेधारकाने हा त्याचा नविन पर्सनल नंबर असल्याचा फिर्यादीला Whatsapp संदेश पाठवुन तात्काळ एका बॅंक खात्यावर रुपये १,९८,००,०००/- पाठविण्यास सांगीतले. सदरचा संदेश हा कंपनीच्या डायरेक्टर यांनीच पाठविला असल्याचे फिर्यादी यांना वाटल्याने फिर्यादी यांनी तात्काळ कंपनीच्या बॅंक खात्यातुन रुपये १,९८,००,०००/- आरोपीने सांगीतलेल्या बॅंक खात्यावर पाठविले. त्यानंतर फिर्यादीने पैसे पाठविल्याबाबतचा संदेश कंपनीचे डायरेक्टर यांच्या मुळ नंबरवर पाठविल्याने कंपनीचे डायरेक्टर यांना त्यांची फसवणुक झाल्याचे निष्पण्ण झाले.

त्यानंतर फिर्यादीने तात्काळ सायबर पोलीस ठाणे दक्षिण विभाग, सायबर गुन्हे, गुन्हे शाखा, मुंबई यांच्या मदतीने मुंबई पोलीसांच्या १९३० सायबर हेल्पलाइन वर संपर्क साधुन तक्रार नोंदविली. त्यानंतर मुंबई पोलीसांच्या सायबर हेल्पलाइन १९३० च्या पथकाने तात्काळ पाठपुरावा केल्याने मुंबई पोलीसांना फिर्यादीचे रुपये १,८३,०३,४९२ /- (९२ %) वाचविण्यात यश आले.

सदरची चांगली कारवाई सायबर पोलीस ठाणे दक्षिण विभाग, मुंबई चे व.पो.नि. श्री. नंदकुमार गोपाळे, स.पो.नि. श्री. इशान खरोटे, १९३० सायबर हेल्पलाइन कक्ष अधिकारी स.पो.नि. पुनम जाधव व त्यांचे पथकातील पो.ह.क्र. किरण पाटील व म.पो.शि.क्र. १५०६७४/सारिका शेगर यांनी पार पाडली आहे.

**नागरिकांना आवाहन/ प्रतिबंधात्मक उपाय :-**

- कंपनीच्या वरिष्ठ पदाधिकारी असल्याचे भासवून व्हॉट्सॲप व इतर सोशल मिडीयाच्या माध्यमातून संपर्क करणाऱ्या व्यक्तिंची खात्री केल्याशिवाय त्यांच्या मॅसेजेसला प्रत्युत्तर देवू नये.
- अनोळखी मोबाईलवरून वरिष्ठ पदाधिकारी असल्याचे भासवून व मोबाईल क्रमांक बदलला असल्याचा मॅसेज पाठवून त्यांच्याकडून नवीन प्रोजेक्टसाठी अथवा इतर कारणांसाठी पैसे पाठविण्याबाबत मेसेज आल्यास मॅसेजची खात्री केल्याशिवाय ऑनलाईन रक्कम पाठवू नये.
- वरिष्ठ अधिकारी यांचा व्हॉट्सॲप व इतर सोशल मिडीया प्रोफाईल फोटो असलेल्या अनोळखी मोबाईल क्रमांकाची पडताळणी करूनच प्रत्युत्तर दयावे.

जर आपल्यासोबत सायबर संदर्भात गुन्हा घडल्यास तात्काळ सायबर हेल्पलाईन क्र. १९३० किंवा आपले नजिकच्या पोलीस ठाणेशी संपर्क साधावा.

#cybersafemumbai

**Report Cyber Crime On Helpline 1930 OR https://cybercrime.gov.in**